दिनांक १५.१.९३ पर्यंत पुणे येथील मूळ समितीकडे प्राप्त झालेली प्रकरणे या समितीकडे वर्ग करण्यात आलेली आहेत. तरी यापुढे प्रलंबित व नविन प्रकरणांबाबतचा संपूर्ण पत्रव्यवहार या समितीकडे करण्यात यावा.

बहुतांशी प्रकरणात असे निदर्शनास आले आहे की, जमातीची प्रमाणपत्रे तपासणीची प्रकरणे या समितीकडे पाठविताना संबंधित इसमाच्या फक्त जमातीची प्रमाणपत्रे पाठविली जातात. परंतु तपासणीकरीता आवश्यक असलेली इतर कागदपत्रे पाठविली जात नाहीत.

तरी जमाती प्रमाणपत्र तपासणीची प्रकरणे तपासणीसाठी या समितीकडे पाठवितांना खालील बाबी विचारात घेऊन त्याप्रमाणे <u>प्रकरण सर्व कागदपत्रांसह स्वतंत्ररित्या या समितीकडे पाठवावीत.</u>

अनुसूचित जमातीच्या जातीची प्रमाणपत्रे तपासणीसाठी पत्राचे सोबत जोडलेल्या प्रपत्राप्रमाणे उमेदवाराचे नातेसंबंधातील परिपूर्ण तपशिल असलेले आवश्यक असून सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे आवश्यक दाखले व कागदपत्र [एकूण १ ते १८] प्रकरणासोबत असल्याशिवाय सदर प्रकरण पूर्ण समजले जाणार नाही.

सदर तपासणीचे काम हे "अर्धन्यायीक" [ Quosi Judicial) ] स्वरूपाचे असल्याने नमुद केलेली आवश्यक सर्व कागदपत्रे अर्जासोबत असल्याशिवाय समिती सदर "दावा" तपासणीकरिता दाखल करून घेऊ शकणार नाही.

प्रत्येक तपासणीचे दाव्यात मुलभूत अधिकार व कायदेशीर बाबींचा विचार करता सादर करण्यात आलेला पुरावा व आवश्यक तेथे म्हणणे मांडण्याची/बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतरच निर्णय घेणे शक्य होते. आतापर्यंत असे निदर्शनास आले आहे की :-

१. संबंधित विभाग/उमेदवाराकडून संपूर्ण कागदपत्रे सादर करण्यात येत नाहीत.
२. कागदपत्रे सादर करण्याबाबत वेळोवेळी कळवूनही कागदपत्रे सादर केली जात नाहीत/विशिष्ट कागदपत्रे सादर करण्यात टाळाटाळ करण्यात येते/ वारंवार मुदत मागण्यात येते.
३. मुलाखतीच्या वेळेस मूळ कागदपत्रे तपासणीकरिता सादर करण्यात येत नाहीत.
४. उमेदवार मुलाखतीस दिलेल्या तारखेस उपस्थित रहात नाहीत व मुलाखतीत मागितलेली/कबूल केलेली कागदपत्रे/माहिती वेळेत समितीस सादर करीत नाहीत.